# शासकीय तंत्रनिकेतन, अंबड.

म्हाडा कॉलनी, पाचोड रोड, अंबड

E-mail : gpambad.dte@gmail.com

## चांगले नागरिक व अभियंता घडविण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामधील सुसंवाद आवश्यक: डॉ. ए.एम. जिंतुरकर यांचे प्रतिपादन

अंबड: येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये ई.स.२०१८-१९ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविकाच्या विद्यार्थ्याकरिता विद्यार्थी व पालक मेळावा दि.२०/०८/२०१८ रोजी संपन्न झाला. अणुविद्युत विभागाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाकरिता विद्यार्थी व पालक बहुसंखेने उपस्थित होते.याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संस्थेचे प्राचार्य डॉ.ए. एम. म्हणाले की "चांगले नागरिक व अभियंता घडविण्यासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामधील सुसंवाद आवश्यक आहे. उत्कृष्ट अभियंता आणि नागरिक घडविण्यासाठी संस्था कटिबद्ध असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थेमार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. विद्यार्थी आणि पालक यांचा या प्रतिसाद संस्थेच्या हुरूप वाढविणारा आहे." याप्रसंगी संस्थेचे प्रशिक्षण व अस्थापना अधिकारी प्रा. एस. आर. पाटील यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची विद्यार्थ्यांना माहिती दिली. शासनाच्या विविध योजना त्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता याची माहिती श्री. वाव्हाल यांनी विद्यार्थ्यांना दिली. संस्थेत उच्च गुणवत्तेने प्रवेशित विद्यार्थी आणि विद्यार्थिनीचा पालाकासमवेत प्रातिनिधिक स्वरूपातील सत्कार संस्थेचे प्राचार्य डॉ.ए. एम. जिंतुरकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी निवडक पालकांनी आपल्या मनोगतातून संस्थेबद्दलच्या अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केल्या. या कार्यक्रमाकरिता संस्थेचे उपप्राचार्य डॉ. एस.एस. कानडे,यंत्र विभागाचे विभागप्रमुख डॉ.डि.एस.चव्हाण,संगणक अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा.एस.बी.वीर,माहिती तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख प्रा.एम.ए.धायगुडे, स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रा.ए.आर.बैस, विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या विभागप्रमुख श्रीमती प्रा.एस.एन.देहेडकर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. तायडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिमखाना उपाध्यक्ष प्रा. पी. यु. आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व अधिकारी व विद्यार्थी यांनी मेहनत घेतली.

